शं. पु. आजगांवकर

काव्य संग्रह



# क्रान्ति पराग

## —: सादर समर्पण :—



श्रीयुत जी. एम्. दिवेकर, सॉलिसिटर्स

प्रसिद्ध विचारवंत, नामवंत कायदेपंडित
आणि सामाजिक कार्यात स्वतःला
सर्वस्वी वाहून घेणारे असे
श्री. जी. एम्. दिवेकर
सॉलिसिटर्स, यांस

माझा हा पहिलाच काव्यसंग्रह प्रेमाने
आणि आदराने अर्पण केला आहे.

— गुं. फ. आजगांवकर

# क्रान्ति पराग

कवी

**प्रभू गुंफराज**

---

संपादक

**संतोष आजगांवकर**

प्रकाशक :

**संतोष आजगांवकर**
प्रबोधन रिसर्च असोशिएट्स
१७ के. जी. बी. निवास
गिरगांव, मुंबई ४०० ००४.

●

प्रसिद्धी : डिसेंबर, १९८५

●

**किंमत १५ रुपये**

●

मुद्रक :

**सौ. माधुरी मधुकर म्हात्रे**
नरेश मुद्रणालय
चेंढरे, अलिबाग–रायगड.

# हृद्गत्

प्रस्तुत काव्यसंग्रहांतील कविता लिहून चाळीस वर्षाचा कालावधी लोटला. पुढील कालांत मी काव्याकडे पाठ फिरविली. कवी म्हणून मी ओळखला जावा असे मला वाटले नाही. लेखनाच्या व प्रकाशनाच्या कार्यांत मी ओळखला गेलो ते मात्र ह्या काव्यलेखनामुळे. लेखक, संपादक, आणि प्रकाशक या तिन्ही नात्यांनी मराठी वाङ्मयांत मी घातलेली भर अनुल्लेखनीय नाही. आयुष्यभर मी हेच कार्य करीत आलो. ग्रंथ खरेदीचा मला शोक आहे. उत्तमोत्तम ग्रंथांचा संग्रह करणे हा माझा आवडता छंद आहे. त्यासाठी हजारो रुपये खर्च केले. प्रकाशनाच्या कार्यातही मी अमाप पैसा घालविला. मागणी पाहून पुरवठा करणाऱ्या धंदेवाईकांत मी कधी फिरकलो नाही. ग्रंथ विकले गेले नाहीत म्हणून मी कोणाची पर्वा केली नाही. मला त्याची कधीच खंत वाटली नाही.



**गुं. फ. आजगांवकर**

आज मी माझा पडून राहिलेला काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचे ठरविले आहे.

थडगी आणि निखारे !

ओबडधोबड दगडांची रास जिथं दिसेल तिथं थडगं आहे असं समजा. कलाकुसर नाही.

केवळ अस्तित्वाची खूण...
ज्यानी निखारे तुडविले ते इतिहासजमा झाले आहेत.
ते असिधारा व्रत, ती पोलादी यष्टी दगडाआड मूक स्थितीत आहे,

कोण बोलू शकणार ? कोण समजू शकणार ?
जे ओळखतील ते आदर दाखवतील.
कसली तरी अंधूक स्मृती आणि अश्रू !
ह्या कवितांत गेयता आहे आणि नाहींही.

अपरिचितांना वाटेल–दगडांनीच जागा अडविली आहे. उपहासाने हसतील ते !

निखाऱ्यांऐवजी त्यांना कोळसे दिसतील. कसाही उगळला तरी कोळसा काळा ह्या पलिकडे ते काय सांगणार ?

पण ज्यांनी निखारे तुडविले आहेत ते असं म्हणणार नाहीत. कोळशाच्या

ठिकाणी रसरशीत निखारे असल्याची त्यांना खात्री पटेल. ते म्हणतील ' कोळसा ' हा आभास आणि ' निखारे ' हेच सत्य कारण...

—हा अग्नी आम्ही पचविला आहे. आज हे कोळसे पहाताना पूर्वीइतकाच जाणवतो आहे तो !

ह्या संग्रहाला १९४६ मध्ये सुप्रसिद्ध लेखक आणि कवि कै. सदानंद रेगे यांनी ' मानव्याच्या दिशा ' ह्या मथळ्याखाली प्रास्ताविक लिहिलं होतं. श्री. रेग त्यावेळी अगदी तरूण होते आणि लेखक म्हणून नुकतेच कुठे उदयास येत होते. त्यांच्याकडून मुलांसाठी मुद्दाम लिहून घेऊन एक पुस्तक मी प्रकाशित केले होते. त्याचे नाव ' रडतोंडीचा घाट ! ' रेग्यांची व माझी शेवटची भेट पुरंदरे सभागृहांत एका दलित प्रतिनिधीक काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले तेव्हा झाली. त्यावेळचे त्यांचे वक्तृत्व अत्यंत प्रभावी व स्पष्टवक्तेपणाचे द्योतक होते.

थोडयाच दिवसांनी रेगे स्वर्गवासी झाल्याचे समजले. ते अविवाहित आणि एकाकी होते. ते गेल्याचे दुःख त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य वाचकांना आणि मित्रांना झाले तर नवल नाही. कालाचा अप्रतिहत वाहणारा ओघ एकेकाला घेऊन जात आहे. जीवनाची वाटच मृत्यूच्या दारांतून जात आहे.

प्रस्तुत काव्यसंग्रह कोणाला काय सांगून जाईल हे सांगवत नाही. माझ्या जीवनाचे प्रतिबिंब त्यांत उमटले असेल का ?

रसिकांना स्वातंत्र्य आहे. गायकांना मोकळीक आहे. भविष्यांत येणाऱ्या भावी पिढ्यांसाठी एका सामान्य माणसाने ठेवलेली ही भेट आहे.

—गुंफराज

# मानव्याच्या दिशा

Be strong... be manly ! —Swami Vivekananda

हा छोटासा काव्यसंग्रह चाळून एखादा मास्तर जर शाळेतल्या पोरांच्या कपाळी मारण्याजोगें सुंदर सुंदर मखमली उपमा उत्प्रेक्षा वगैरे सारखे अलंकार शोधून काढण्याच्या नसत्या खटाटोपांत पडणार असेल, तर त्यानं हा काव्यसंग्रह हातात न घेणंच बरं ! माझ्या समजुतीप्रमाणे खुसखुशीत गाणी गाऊन दिलाला क्षणभरसा'दिलासा देण्यासाठी कवीने ह्या कविता रचलेल्या नाहीत. तर रसिक वाचकांच्या हृदयात प्रक्षोभक जीवंत विचारांचा बगीचा फुलविण्यासाठीच कवीने हा प्रपंच केला आहे. म्हणूनच यांतील कवितांचे जीवन अधिक खुलं झालं असावं. मला हे पूर्णांशानं मान्य आहे की, कविता ही आधी कविता असावी, जिला आपण कविता म्हणतो, तीत काव्य असावं, ती गेय असावी वगैरे. 'काव्य' (Poetry) या शब्दांची व्याख्या देण्याचा प्रयत्न बऱ्याच पाश्चिमात्य टीकाकारांनी अन् त्यांच्या पावलांवर पाऊल टाकून आमच्याकडच्याही तज्ज्ञांनी आटोकाट प्रयत्न केलेले आहेत. ती मनमतांतरे लक्षांत घेऊनही थोडक्यांत सांगायचं म्हणजे कवीचं मनच असं संस्कारक्षम झालेलं असतं की, हृदयांतला विचारांचा, भावनांचा ओघ अनावर झाला की, गीतांची वर्तुळं घेऊन तो बाहेर पडावा. काव्याच्या कसोटचा लावून पहातां या संग्रहांत सौन्दर्य आहे ते 'विचारांचं' आहे. काव्य आहे ते 'जीवनांतील सत्यत्वाचं' आहे. या संग्रहांतील कवितांत असलेली गेयता खऱ्या गायक कलावंतालाच कळू शकणारी आहे. कारण प्रत्येक शब्दातील प्राणाला स्वरांची लेणी चढविली की प्रत्येक कविता श्रुतिमधुर होऊन नादब्रह्माचे दर्शन घडवू शकेल अशी समर्थ आहेत. कवीच्या म्हणण्याप्रमाणे कसल्याही 'बेगडी, खोटचा, कृत्रिम' तंत्रवादाकडें लक्ष द्यायला परतंत्र भारताच्या साहित्यकारांना वेळ नाही त्यांना कलेचं कलेवर उभं करायचं नाही, कलेत आधी आत्मा ओतायचा आहे. आसमंतांत उफाळून उठलेल्या मानवाच्या यज्ञज्वाळेत त्याचं मन तापून निघालं आहे, सोन्यासारखं शुद्ध झालं आहे; हे म्हणणं कोणालाही मान्य होऊ शकेल खास. कारण केवळ कलावादावर माझा विश्वास नाही. 'जीवनासाठी कला' या तत्वावर माझी श्रद्धा आहे अन् म्हणूनच, कलात्मक दृष्टचा स्वतंत्र अशा या कवितांकडें मी आपुलकीनं पहातो.

या संग्रहात कवीने निसर्गचित्र, प्रेमभावना आणि सामाजिक दुःख याविषयीचे आपले ज्वलंत अनुभव खुबीने गुंफिले आहेत, म्हणूनच प्रत्येक कविता ही शुभ संकल्पाची साधना झालेली आहे. कवीची कल्पनाशक्ती आणि प्रतिभा इतकी हळवी

आणि कोमल आहे की त्याला देशाचे, समाजाचे आणि निष्पाप व्यक्तीचे दु:ख हे आपलेच दु:ख वाटते आणि म्हणूनच तो व्यथित होतो. वर्ण्य विषयाशी समरसता हा कवीचा आणखी एक महत्त्वाचा गुण आहे. म्हणूनच या कविता नटव्या निर्जीव बाहुलीसारख्या नसून रसरसीत अशा यौवनाने मुसमुसलेल्या वनकन्येसारख्या ललित लावण्यवती वाटतात.

ऑगस्ट क्रांतीच्या धगधगत्या निखाऱ्यांतून या कविता फुलून निघाल्या आहेत एवढं सांगितलं म्हणजे त्यांतील जीवनाच्या दिशा ओळखणं अगदीच सोपं होईल. तसं पाहिलं तर जीवनाचा सर्वांगीण विकास जी करू शकते ती क्रांति असंच म्हटलं पाहिजे. असं जर आहे तर साहित्य हाही एक जीवनाचा भाग नाही का? मला सांगायचं आहे ते एवढंच की, ऑगस्ट आंदोलनानं भारतीय साहित्याच्या इतिहासात एक नव पर्व उघडलं आहे. या पर्वातलं जीवन पूर्वीपेक्षा पुष्कळ विशाल, पुष्कळ प्रामाणिक आहे. या पर्वांतील मानव्याच्या दिशा उजळलेल्या आहेत, नव्या नव्या तेजानं रसरसल्या आहेत. आजच्या भारताचा कलाकार हें जाणून आहे की, त्याची कला जर आज केवळ मातृभूमीच्या पायाशी अर्पिली गेली नाही तर ती कला नव्हे. एखाद्या चंडोलाचं एखादं उडाव गाणं होऊ शकेल फार तर. पण जिथं आमच्या आया बहिणींची अब्रू पणास लागली आहे, जिथं आमच्या घरादारावरून निर्दयतेचे नांगर सर्रास फिरताहेत तिथं मी नुसताच गात कसा बसू? मला गायचं आहे ते दगडांत जीवन निर्मिण्यासाठी. मला लिहायचं आहे तें माझ्या देशाच्या मातीत स्वातंत्र्याचा प्रचंड अग्नि पेटविण्यासाठी, मला नाचायचं आहे ते माझ्या अंतरांतील मानव्याला मूर्त स्वरूप देण्यासाठी.......

माझ्या कलेनं माझ्या देशबांधवांचं एकही पाऊल पुढे टाकण्यास मदत केली नाही तर मी भारताचा कलावंत नव्हे आणि म्हणूनच आजचा कवी गात आहे—

'हे धगधगते लाल निखारे  
मार्गी कुणीतरी तुझ्या पसरले  
नवा प्रवासी, अढळ निश्चयी  
अडेल का कधी सांग ?'

इथं हिंमतीचा प्रश्नच उद्भवत नाही. इथं पारतंत्र्यात जगण्याचा विचारच मनाला शिवत नाही. इथला मृत्यु... इथला मृत्यु हे जीवनाचं दैवत मानल जातं.

'परमेश्वरावर आपण भरंवसा टाकू या आणि त्याच्याच नांवाचा जयघोष करीत मार्ग आक्रमू या, देव जोपर्यंत आपल्या बाजुला आहे, तोपर्यंत दैवही आपल्याच बाजूला राहील.'

वर वर पहाता या ओळी एखाद्या निराशावादी व्यक्तीनं लिहिल्यासारख्या

वाटतात. पण वर सांगितलेल्या नव्या दृष्टीची कसोटी त्यांना लावली की, लगेच निराशावादाच्या अंधाराचं आवरण वितळतं. ही नवी दृष्टी म्हणजे, ध्येय हाच परमेश्वर. स्वातंत्र्य हाच माझा धर्म. मानवाता हेच माझं जीवन. असं जर आहे तर या ध्येयात्मक कर्मयोगावर विश्वास ठेवून त्याच्याच नांवाचा जयघोष करीत पुढं पाऊल टाकायला कोणती हरकत आहे ? अन् म्हणूनच विश्वसेवा करता करता आपण गायचं आहे,

दास आम्ही प्रभुचे–अजिंक्यची ठरणार !

पण स्वतःच्या हृदयाला रिझविण्यासाठी तो मधून मधून मंजुळ गाणी गाऊ लागतो तेव्हा त्याच्या मातृभूमीला हेच कळत नाही की, हा करतो आहे काय ? तिला वाईट वाटतं. ती रडू लागते. स्वतःच्या मुलांच्या कर्तबगारीविषयी तिला शंका वाटू लागते. पण लगेच कविच्या लक्षात ही गोष्ट येते. तिच्या डोळयांतले अश्रू त्याच्या नजरेतून सुटत नाहीत अन् मग तो तिला धीर देतो :

हृदयी तुझ्या आग अन् अश्रू नेत्री
दिसूनी तसा का मी राहू झोपूनी ?

पण इतकं असूनही, शेवटी तोच भांबावून जातो. आपण ज्या मार्गानं जाणार आहोत तो मार्ग अनोखा आहे, रुळलेल्या मार्गाहून निराळा आहे, पण... पण तोच मार्ग ध्येयाप्रत जाणारा आहे याची त्याला निश्चिती असली तरी त्याला कळत नाही. ' लोकांना कसे हे पटवून देऊ ?' अन् इतक्यांत तो ओजस्वी संदेश त्याच्या अंतःकरणाच्या कडाकपाऱ्यांतून घुमतो, ' प्रत्येकानं आपापला पुढारी व्हावं. प्रत्येकाने आपल्याला नेता समजावं ' अन् त्या दऱ्यांतून सूर येतात–

ही क्रांती तशी ! देशांत उठे खळबळ
आहुत्या द्यावया सिद्ध भारती बळ !
पाहतो स्थिती, वाटतो खेद सानंद
सेनापतीवाचुनी सैन्य लढे खंदकी !

याच भावनेतूत हृदयाला धीरता मिळते. अन् आमच्या पूज्य नेत्यांची स्मारकं उध्वस्त करू पहाणाऱ्या क्रूर शक्तींना तो आधीच बजावून ठेवतो–

भाविक आमुच्या हृदयामधुनि
स्मारक त्यांचे घ्या रे पाहुनी
छाती कुणाची पाडायाची ?
...तुम्हास आहे काय ?

इतकं असूनही जीवनाच्या एका अमानवी बाजूकडे कवीचं लक्ष वळल्यावाचून

राहात नाही. पुढे पडणाऱ्या प्रत्येक पावलांबरोबर आपल्या दुर्बलतेची जाणीव त्याला होते. अनं मग स्वतःचा स्वतःलाच धीर देत तो मार्ग आक्रमू लागतो.

चेतव चेतव आग मनाची
आंच असे ती अपमानाची
नको आवरू गती तियेची
समिधा त्या ग्रासुनि पाही
जग दुबळ्यांसाठी नाही

अन् हे जीवन—

मातीमाजी माती मिळतां
हळहळ सुटते कां या जगता ?
मेलेला परि उठू पहातां—
म्हणतील सर्वहि याला जाळा !

मेलेल्यांची थडी उकरूनी
मढी काढिता कशास त्यांतुनि
जिवंतपणी जे तुम्हां न जमले
तेच कराया काय ?

अन् या ओळी पहा कशा वाटतात—

ही मान घालुनि खाली
राहिलो उभा जरी येथे
ना मान द्यावया तुजला—
घे समजुनी तू रे पुरते !

असं या साध्याभोळ्या कवितांचं स्वरूप आहे. यांत ओढूनताणून आणलेली कृत्रीम कलाकुसर नसेल. पण या कवितांचं काव्य जीवंत आहे खास. अन् ते जीवंत आहे म्हणूनच ते आजचं काव्य आहे, आजच्या पिढीचं प्रातिनिधीक काव्य आहे. त्यातलं सौन्दर्य हे जीवनाचं सौन्दर्य आहे......

माटुंगा—१७—७—४६

सदानन्द रेगे

# अनुक्रमणिका


मानव्याच्या दिशा (प्रस्तावना)
हृद्‌गत्
१ निखारे
२ स्वातंत्र्यासाठी
३ पुत्रधर्म
४ तुजवाटे
५ चाल सैनिका अजुनी रणा
६ घे झेप तू हिंद तरूणा
७ माझी इच्छा
८ बंदी
९ नाविका, बंड पुकार
१० ती रात्र
११ महाद्वार
१२ क्रांती तशी
१३ काय कुणा सांगू
१४ थडगी उकरणारांस
१५ मंगलेस
१६ श्राद्ध करणारांस
१७ ही मान घालुनी खाली
१८ द्वारपाल आम्ही तुमचे
१९ मेला 'हाय!' कशाने ?
२० सुख ज्यांचे त्याना
२१ निघालो
२२ माझे घर
२३ इशारा
२४ कां
२५ भग्नमनोरथ
२६ वेश्यंच्या दारी
२७ दास आम्ही प्रभूचे
२८ नराची थोरवी
२९ ध्येयाशिवाय
३० जग कोणाचे
३१ निघालो प्रवासा
३२ चंद्रमौळी घर
३३ घ्या अमृतघट पिऊनिया
३४ मी दर्याचा राजा
३५ नाखवा रे आता सांभाळ सुकाण
३६ रे माझ्या प्रियकरा
३७ साम्राज्य आमुचे
३८ जीवन दर्याचे
३९ हे पटे मला आतांच
४० जग हे दुःखाचा प्याला
४१ उठली पहाट
४२ गोड भूल
४३ सखी आज पौर्णिमा
४४ चालली नाव
४५ एक वात्रटिका
४६ क्षणैक जीवन
४७ विखुरलेले हे अशांकुर
४८ मनांत येते
४९ काजवे
५० भीति जगाला त्यांची
५१ तुझ्या महाली
५२ आवर आवर
५३ विठ्ठलाच्या मंदिरात
५४ जागृति
५५ निसर्ग आणि मानव
५६ ही रीत
५७ अंधारातील दिवा
५८ स्वर्ग सुखास्तव
५९ एक दृश्य !
६० बाल बाला वंदिती देवराया
६१ शब्द थांबती; अर्थ उलगडे
६२ भाग्यवंत कोण ?

# निखारे

जुन्याच्या ठिकाणी नवं येताना विरोध हा व्हायचाच. नव्या ध्येयाने प्रेरीत झालेल्या माणसाचे आचार विचार पाहून काही स्तंभित होतात; काहीं कौतुकाने पहातात आणि काही तीव्र विरोध करतात. आज आपण पूज्य मानतो ज्यांचे, अनुकरण करण्यात धन्यता बाळगतो त्या प्रत्येकाला विरोधाचे धगधगित निखारे तुडवावे लागले आहेत.

हे धगधगते लाल निखारे
मार्गी कुणितरी तुझ्या पसरले
नवा प्रवासी अढळ निश्चयी
अडेल का कधि सांग ?

निंदेचे शर कुणि न सोशिले
इतर प्रवासी न का कष्टले
नव्या क्रांतिचा भावि पुढारी–
खचेल का कधि सांग ?

वज्रदेही तू मार्ग आक्रमी
विश्व दिपेलही तुला पाहुनी
दिपगृहातिल तेज विलोकुनि–
नावाडी बेभान !

हे धगधगते, लाल निखारे
आग संपली राखही नुरे
विमल यशाचा ओघ वाहता–
स्मृतिसागर होय अथांग !

[ 'झारापकर' १९४४]

●

# स्वातंत्र्यासाठी

[क्रांतीची ज्योत तेवत ठेवण्यासाठीच त्या क्रांतिवीरांनी आहुती दिलेली असते.]

आहुती मला द्यायाची,
ह्या माझ्या प्रिय प्राणांची !
रक्ताचे ह्या होइल तेल
ज्योत निरंतर मग तेवेल
दीप्ति हिची व्यापुनि विश्वाला
अखंड येथ उरेल !

मजमुळे ज्योत ही उजळो
जगता मी– मज जग विसरो
इच्छा मजला मनी एकची
ज्योत अशीच जळो

स्वराज्य मजला; तसे तुम्हाला
स्वत्व हवे मज, नको कुणाला !
सिध्द व्हावया हवे तुम्ही हो–
जागविण्या ही ज्योत !

यांतच सर्वां दिसेल वाट
गर्दी होइल लागोपाठ
साध्य आमुचे अखेर आम्हा,
मिळेल काठोकाठ

# पुत्रधर्म !

[खरा पुत्र तोच कीं ज्याला पुत्रधर्माची जाणीव तीव्रतेने होते. १९४२ च्या आंदोलनात भारतमातेच्या सत्पुत्रांनी, पुत्रधर्माला जागून जो आत्मयज्ञ केला त्याला इतिहासात तोड नाही. उद्याची पिढी ही त्यांच्याच पावलांवर पाऊल टाकून चालू लागेल. आणि म्हणूनच भारताचा भविष्य काळ उज्ज्वल आहे हे निःसंशय !! ]

तुझा पुत्र मी अन् तूं माझि आई
कां सांग माते, मग खिन्नता ही
सामर्थ्य संपन्न मी ज्ञान संपन्न
उपयोग ना का इतुकेहि मिळवून ?

जगीं पाहिल्या मी कितीशा सुमाता
दिव्यत्व येथें परि ये दिसून !
तुझी त्याग मूर्ति तुझी दिव्य कीर्ति
असुनी मला ज्ञात राहू क्रियाशून्य ?

पतीवीण कांता छळावी कुणी का,
मी पुत्र असता धजावा असा कोण ?
हृदयीं तुझ्या आग अन अश्रु नेत्री
दिसूनी मला का मी राहू झोपून ?
तो वैनतेयऽऽ झुंजोनि झुंजी
करी मुक्त माता मधुकुंभ आणून
ही शक्ति, हे वित्त हे ज्ञान, हे प्राण
तव मुक्ति प्रित्यर्थ खर्चीन ही आण !!

(महाराष्ट्र ऑगस्ट ४५)

•

# तुजवाटे !

[मरण कोणालाच चुकलेले नाही. महापुरुषांनाही मरणाचा रस्ता चुकविता येत नाही.]

तुज वाटे येइन फिरूनि पुन्हा
रे नको मना गुंतवू दर्शना
प्रेमास्तव जीव परंतू पाहे
मायेंची बेडी न तोडवे
पुढचे पाउल पुढे पडावें
का फिरवे सुटल्या बाणां ?

पडलेले घर येई उभारू
आशेचे गड येति सावरू
उल्कापाता न ये आवरू
का जुळवे तुटल्या प्राणां ?

हृदयसंदुका जी तुजपाशीं
स्मृतिमय झाकण खोलुनि बघशी
दिसतील असंख्य रत्नें राशी
तीं लुटुनि नेउंदे जना

त्या रत्नांतुनी माझे दर्शन
करूनि देतिल प्रतिभा किरण
कवि हृदयाचे घ्यावे तुम्ही ऋण
'जातसों ठेउनी येथ खुणा'!

# चाल सैनिका अजुनि रणा !

हो संधी न येई पुन्हा पुन्हा
रे चाल सैनिका अजुनि रणा !

देशहिताचे बांधुनि कंकण
तूच करावे काय पलायन ?
' देशद्रोही तूं ' हें अभिधान
रुचेल कारे तुझ्या मना—?
तूं चाल सैनिका अजुनि रणा !

पिसाट वारा बघुनि अपेशी
काय सुकाणू सोडि खलाशी
जीवित जाता रसातळासी
कोण पुसे त्या भित्या मना ?
रे, चाल सैनिका अजुनि रणा !

तुटावयाचे जीवन धागे
काय तोडण्या पाहसि मागे
रणांगणी बघ कुंड धगधगे
ही संधी न येई पुन्हापुन्हा
रे चाल सैनिका अजुनि रणा !

# घे झेप तू हिंदतरुणा !

जयहिंद, जयहिंद, करी गर्जना
गर्जोनि घे झेप तू हिंदतरुणा !

गुणवान, बलवान, धिरवान तू
जयशालि प्रियभारत-पुत्र तूं
आशा निराशा तुज काय होती ?
कधि मालवे काय स्वातंत्र्य ज्योती ?

सभोंवतालच्या या तुरुंगातुनी,
करिती तुझे बंधु आक्रंदन !
तयां सोडवाया, जगा जागवाया,
तुझ्यावाचुनी सांग धावेल कोण ?

शिळें कूजकें खाउनीयां विषान्न,
विषारी जिभा लाळ ही गाळती
अरे हिंस्र ही श्वापदे मोकळी ना ?
तुझ्यावाचुनी सांग कोणास खंती !

सभोंवार अंधार हा साचलेला–
कुणाला नसे शाश्वती जीविताची;
अरे ऐक ही क्रंदने अन् उसासे–
तुझ्यावाचुनी लाज कोणास त्याची ?

# माझी इच्छा

कलावंताचा त्याच्या जिवंतपणी होणारा उपहास पाहिला आणि मरणानंतर त्याचा होणारा उदोउदो पाहिला म्हणजे वाटतं...आपणही मरावं. एकदाच नव्हे अनेकदा !

पाहिन मरणा, माझ्या डोळां
करतिल जो जो मरणसोहळा !

दुखवटयाच्या सभाहि भरतिल–
ठाईं ठाईं जन हे रडतिल
प्रतीकें करण्या उतचि येइल
दृष्टिआड होईल सोहळा
पाहिन मी तो भरुनि डोळां !

जित्या माणसां भुतें बनवुनि,
मेल्या शरिरा हार घालुनी,
वाजत गाजत जाळा सरणी !
विपरित ऐसा, मरण सोहळा–
मोहि वांछितों बघण्या डोळां !
मातीमाजी माती मिळता,
हळहळ सुटते कशास जगता ?
मेलेला परि उठू पाहता–
म्हणती सर्वही, याला जाळा !
पाहिन मरणा माझ्या डोळां
स्वतः मरुनियां, जगास बघणे
स्वतः हसुनिया जगा रडविणे
मेलेल्यांची खंत न करणे
जित्या मढयांना बघुनि रडाया–
पाहिन मरणा माझ्या डोळां !

●

# बंदी ?

ती एक महान् व्यक्ती होती. जगातील कोपरान् कोपरा त्याच्या तेजानं उजळून गेला होता. जग त्याच्याकडे आदरानं पाहत होतं आणि राजसत्ता त्याला बंदी समजत होती !!

जग पुन्हा पुन्हा वंदी
कोण म्हणे त्या पुरुषा बंदी ?
सत्यास्तव जो अविरत लढला
ना अवलंबी जो हिंसेला—
सत्याग्रहि तो वीर, तयाला—
कोण करिल बंदी ?

जग पुन्हा पुन्हा वंदी !
हास्य जयाचे महन्मंगल,
दु:खांनीं करपले शांतबल,
मेघ दयेचा पाऊस पाडिल
दवडिल कोण ही संधीं !

जग पुन्हा पुन्हा वंदी !
नभोमंडळी सूर्य प्रकाशे
स्वयंपूर्ण जो तमा विनाशे,
कोण भास्करा घालुन फासे—
करुंऽ धजे बंदी ?

जग पुन्हा पुन्हा वंदी !
विश्व जयाच्या कृतीस मान्य
शब्द जयाचा हो न अमान्य
त्या पुरुषा लेखुनि सामान्य
कोण म्हणे रे बंदी ?
जग पुन्हा पुन्हा वंदी !!

# नाविका बंड पुकार !

[वर्णभेद, अपमान कमी पगार यामुळे चीड येऊन भारतीय नौसैनिकांनी इंग्रज अधिकाऱ्यांच्याविरुद्ध बंड पुकारले होते. अधिकाऱ्यांनी दडपशाहीचे धोरण स्वीकारल्यामुळे या संपाचें रूपांतर हिंसक प्रतिकारात झाले. त्यापूर्वी नौसैनिकांनी आपल्या सहकाऱ्यांना पुढीलप्रमाणे संदेश पाठविला होता असे म्हणतात–]

बंड पुकार, नाविका बंड पुकार !
अपमानास्पद, असह्यतात्मक–
जाचा न कधिहि स्विकार !

काळा गोरा भेद न तुजला
कर्तृत्वास हुशार;

उच्चनीच हा भेद करिति जे–
उचल उचल पैजार !
नाविका बंड पुकार !!

विश्वाला गवसणी घालुनी
भीक मागती का दिनरजनी
दारिद्र्याच्या, अपमानाच्या–
भवरीं का बुडणार ?

या या सारे असाल तिथुनी
समोर ठेवा तोफा रोखुनी
द्वंद्व खेळु या एक होउनी
'दिल्ली चलो !' हा युद्धपुकार !

जिणे नि मरणे देवा हातीं
कृति न् कीर्ति तुझ्या मनगटी
'मरूं परीना उरूं यापुढें'
ही अमुची ललकार !
नाविका बंड पुकार !!

सहनशक्तिला काहि सुमार,
गुलामीत कुठवर कुजणार ?
देश पेटला, अंगार फुले हा
‘ चले जाव ’चा करा पुकार !

सत्याग्रही तू सत्य पुकार
सत्यास्तव परमेश पुकार
देश तुझा तर तुझ्या पाठिशीं
का घ्यावी माघार ?
नाविका बंड पुकार ! !

[ दर्यावर्दी दीपावली विशेषांक १९४७]

•

## ती रात्र

काळोख पसरला हा–
किति दूर दूर पर्यंत !
किरकीर किती उठली ही
जणू भयाणता वाढवित !

वादळी वायुचा झोत
झोंबतो शरीरा मेथ
तडतडा दात आदळत
ऐशा या भयाण रात्री–
चांदण्या खेळती मात्र !

•

# महाद्वार !

[स्वातंत्र्याच्या महाद्वारातून भाग्यवंतांना प्रवेश मिळतो.]

हे येथे तुम्हा अम्हा खुले महाद्वार
नवा मनू, दूत नवे, अन् नवे विचार !
विशाल मानव्याचे मंदिर,
शान्तीसमतेचे हे आगर
चला बंधुनो उठा चला तर
गर्जत जयजयकार !
बंधुनो, गर्जत जयजयकार ॥१॥

क्रांतिकुंड हे रसरसलेले
जळो विषमता अन् द्वेषमुळे
दुःखानी किती जीव तळमळे
रे ऐका हाहाक्कार ॥२॥

रात्र संपली अज्ञानाची
जाग येतसे नव्या जगाची
नव उत्साहें नव मार्गाने
म्हणा पुढे जाणार ॥३॥

गर्जत जयजयकार !
महाद्वार हें मानव्याचे
महाद्वार हे मांगल्याचे
महाद्वार हे नव्या क्रांतिचे
चला करित ललकार ! ॥४॥

●

## ही क्रांति तशी–

बघ आग सभोतीं–
खवळुनि धावे खाया

अन् सती त्यांतची,
उत्सुक तन्मुखि जाया !

भंगला कडा हा,
दरी कितीतरी खोलऽ

परि उडी टाकण्या–
निर्झर करि खळखळ–

थैमान घालतो,
मारुत वर्षाकाळीं

अन् विजा कडाडुनि–
पडती त्या अवकाळीं

ही क्रांति तशी,
देशात उठे खळबळ कल्लोळ

आहुत्या द्यावया, सिद्ध भारती बळ !
पाहतों स्थिती, वाटतो खेद सानंद
सेनापतिवाचुनि, सैन्य लढे खंदकीं !

## काय कुणा सांगू ?

काय कुणा सांगू–
कसे जगा पटवू ?

लांगुलचालन कळत न मजला,
डिवचुनि घेणे जमत न मजला;
मार्ग निराळा– ना रुळलेला
कसा परी पटवू ?

घरकुल तुमचें विश्व तुम्हाला
खेंळत खेळा त्यातचि रमला
कासाविस या करी जीवाला
कसे कुणा सांगू ?

प्रथम अपेक्षा नंतर पूजन
अंतरि आशा, देता दान
अवलोकुनि मन होय विषण्ण
दुःख कुणा सांगू ?

नित्य देतसे सूर्य स्वतेजा
नदिनाल्यांतुनि पाणी प्या जा
नाहीं अपेक्षा पुरवा गरजा
दिव्य कसे पटवू ?

नसे अपेक्षा मज कीर्तीची
सृष्टी माझी दिव्यत्वाची
क्षणभंगुरता मला न जाची
का जगता सांगू
का कोणा पटवू ?

२०–१–४४

# थडगीं उकरणारांस

[आझाद हिंद सैनिकांची स्मारके ब्रिटिश सेनेतील हिंदी सैनिकांनी उध्वस्त करून टाकल्याचे वृत्त वाचून मन खिन्न झाले.]

मेलेल्यांची थडी उकरूनी
मढी काढिता कशास त्यातुनि
जिवंतपणी जें तुम्हा न जमले,
तेंच कराया काय ?

स्विकृत कार्यी बुद्धि रंगली
विश्रांती ज्या कधि न मिळाली,
चिरविश्रांती घेण्या निजती
ते न पाहवे काय ?

ज्यांच्या पुढती जी जी करिता
ज्यांच्या पुढती नाक घासता
तेही ह्यांना थरथरताना
कधी न दिसले काय ?

वाणी ज्यांची जगा मोहवी
कृती जयांची जगास तारी
मरणे ज्यांच्या विश्व हळहळे
तें न पाहवे काय ?

भाविक अमुच्या हृदयामधुनी
स्मारक त्यांचे घ्यारे पाहुनी
छाती कुणाची पाडायाची
तुम्हास आहे काय ?

●

# मंगलेस

[रणांगणावर लढणाऱ्या मराठ्याच्या आयुष्यातील हा अखेरचा प्रसंग त्याची पत्नी मंगला दूर... शेकडों मैल दूर आहे- मशिनगन हीच त्याची सोबतीण ! ]

हा जीव तुला वाहिला
प्रितीची तू माझी मंगला

जिवाची जोडीदारिण
समरांत खेळ मौजेनं
तीळभरी न तुला बंधन
मी तर खडा तुझ्या सेवेला
प्रितीची तू माझी मंगला

चालुदे संगिनीची खणखण
वरी विमानांची भुणभुण
रणगाड्यांचे रणनर्तन
मी तर खडा तुझ्या सेवेला–
प्रितीची तू माझी मंगला !

थकलिस तू अन् मीहि संपलो
तुझ्या जीवावरि अजुनी लढलो
तवसन्निधि ह्या रणी झोपलो
खेळ चालुदे तुझा साजणी

जीव तुला वाहिला–
प्रितीची तू माझी मंगला !

●

# श्राद्ध करणारांस

जगी नाहीं आम्हा कोण
स्वतः मिरविती करिती पूजन
परिस्थितीशी झुंज झुंजुनी
स्वत्वाचा कर ज्यांनी उभवुनि
नादविले जग स्फूर्तिरवांनी
जाता त्यांचा प्राण—
कशास पूजन—कशास तर्पण ?

श्राद्ध कुणाचे कशास करता
श्रद्धाची का तुम्हास चिंता
श्राध्दावाचुनी अमुच्या चित्ता
लाभू द्या समाधान,
जगि नाही आम्हा कोण

स्मृती आमुच्या असती बरोबर
कशास मन हो तुमचे कातर ?
नयनांमधुनी अश्रू झरझर
वाहविता का पण—
जगि नाही आम्हा कोण

झाले गेले, पुढेहि होतिल
शोधुनि त्याना उत्तेजाल
श्राध्द पोचले फळ पावाल
सांगणे न ह्यावाचुन
कशास पूजन—कशास तर्पण ?

•

# ही मान घालुनी खाली

ही मान घालुनी खाली
राहिलो उभा जरि येथे
ना मान द्यावया तुजला
घे समजुनि तू रे पुरते !

ही मान लवावी माझी
रात्रन्दिन ध्यास मलाही
अभिमान मना वाटावा
अन् शांति स्फुरावी देहीं

ही मान घालुनी खाली
राहिलों उभा जरि येथें
अंतरीं डोंब आगीचा
जाळीत सदा देहातें

ही मान घालुनी खालीं
राहिलो उभा जरि येथें
धुंडिते नजर माझी ही
भूगर्भि काय झगमगतें ?

ही मान घालुनी खाली
राहिलों उभा जरी येथे
हें दैव नमविते मजला
अन् मीही तुकवितों माथें

उलटेल जेधवा वारा
काढुनी पुढें छाती ही
चालेन तेधवां परि तू–
अस्तित्व तुला न कुठेही !

●

# द्वारपाल आम्ही तुमचे

[स्वातंत्र्यवीरांची मनोभावना]

राखेमधुनी उठेल मंदिर
अस्थी अमुच्या पुजे लागतिल
नव तरुणांची गर्दी होइल
हात देउनी त्यांच्या हातीं
सोबत करूया त्यांना !

सरणामाजी सरतिल मरणे
मरणामधुनी अमुचे जगणे
मरणातुनि हे जग सोडविणे
पंथ आमुचा जयां मानला–
साह्य करूया त्याना !

विपुल आमुच्या संपत्तीचा,
हक्क अशांना उपभोगाचा,
असे अर्पिला हा मानाचा
तुम्ही भोगणे, इतरां देणे
भरुनि पावलो येणे !

कोणी न तुमची अडविल वाट
सहस्त्र तुमच्या पाठोपाठ !
तुम्हा चालवू धरूनि हात
तुमची सरणे, तुम्हा भूषणें
द्वारपाल आम्ही तुमचे !

# ' मेला हाय !' कशाने ?

महेंद्र चौधरी, राजनारायण मिश्र आणि असे कित्येकजण दरोडेखोर म्हणून फासावर लटकले. त्यापैकी फारच थोड्यांची माहिती देशाला असेल.

फासावर जाण्यापूर्वी पुढीलप्रमाणे विचार, त्यांच्या मनात आले असतील का ?

लटकेन जराशाने; फासावर–
लटकेन जराशाने !
आणि न कधिहि कळेल कोणा
मेला ' हाय ! ' कशानें
जीं जीं केलीं साहसकर्में–
ज्या ध्येयासाठी;
ध्येय निमाले, मीहि संपलो
शेवट आटाआटी
स्वातंत्र्यास्तव जे जे लढले–
पुजे तयांना देश
अन् नशिबीं का माझ्या यावा
अखेर हा फास ?
कुटील नीति, असे जगाची–
' तोंडावर हांसू ! '
हांसत जातिल मानवतेच्या
तोंडा काळे फासू
मरणाचे भय कधी न शिवले,–
जन्मामधि जीवा
चोरासम हा मृत्यु येतसे,
चोरुनि घाली घावा
माझ्याघरीं का मीच लुटारू;–
न्याय करिति हे चोर
अन्यायाचा अन् वरवंटा
फिरेल मानेवर !
लटकेन जराशाने; फांसावर–
लटकेन जराशाने !
आणि न कधिहि कळेल कोणा
मेला ' हाय ! ' कशाने ? ●

# सुख ज्याचे त्यांना

स्वातंत्र्याच्या वाऱ्यावरती
स्वतंत्रपक्षी विहार करिती
स्वतंत्रतेची गीते गाती
सुख त्यांचे त्याना-
कळावे कसे सांग भलत्यांना ?

उंच तटाच्या भितीआड
हातीपायीं साखळदंड
तालावर त्या गाती प्रचंड
सुख ज्यांचे त्यांना
कळावे कसे सांग भलत्यांना ?

वादळलेल्या क्षुब्ध सागरी
पिसाटलेली नाव आवरी
मरणा भावी जाणे अंतरीं
सुख ज्यांचे त्यांना !
कळावे कसे सांग भलत्यांना

•

# निघालो

निघालो निघालो निघालो रणा
अगे मातृभूमे तुझ्या रक्षणा !
तुवां पोशिले वाढवीले तुवांची
तुझ्या काय आम्ही न फेडू ऋणा

तुवां पोशिले गे मला अन् अम्हाला
तुवां पोशिले सृष्टीच्या दिग्गजाला
तुझें दानशूरत्व ना तूलनीय
जगीं एक तूची मला वंदनीय

मनी मानसीं चिंतुनिया स्वराज्य
जगीं कष्टले आणि मेले अशांना
म्हणोनी तयानाच गाजी शिवाजी,
मी हा वंदितो अन् कृपा वांछितो जी !

जरी घ्यावयाचा पुन्हा जन्म झाला–
तरी घेऊ निःशंक ह्या भारतीं !
तुझे पुत्र आम्ही तुझे पांग फेडू
कवी माधवासारखे[1] गर्जती

टीप १ कवी माधव

# माझे घर

[ज्याला आश्रय द्यावा तो मालक बनतो आणि खऱ्या मालकाला स्वतःच्या घरातच आश्रितासारखे रहावे लागते. काळाचा महिमा ! ]

होताच तुझा शिरकाव
माझ्या घरि मज मज्जाव
काय मिषाने तूं आलासी
धूर्तपणे तू घरात शिरसी
वाटसरू तू असुनि, शिकारी !
माझ्या घरी मज करिही भिकारी
मी इथे रांगलो इथे वाढलो
माझे माझे म्हणुनि वागलो
अतिथी म्हणुनि आलास
अन् मलाच् बनविसी दास !
मी जेव्हा होतो राजा
चालल्या न तेव्हा गमजा
जंव तुझ्या स्वागता आलो
मी गुलाम तेथचि बनलो
होताच तुझा शिरकाव
मज माझ्या घरी मज्जाव !

●

# इशारा

[सूडबुद्धीने जळणारी माणसे पाहिली की बिळाच्या आश्रयाने राहून दंश करण्याची वाट पहाणाऱ्या सर्पाची आठवण होते. पराक्रमाऐवजी विषच असते त्यांच्यात. त्यांना स्वतःचा मृत्यू दिसत नाही.]

राहीं स्तब्ध बिळात
फणिवरा, फिरतो गरुड नभात

धुस्फुसशी जरी दंश धरूनी
धुमसत आहे अग्नी तव मनी
फिरकू नको उघड्यात !
फणिवरा फिरतो गरुड नभात ॥१॥

काळ तुझ्या दाढेत राहतो
तुला म्हणुनि का ताठा येतो ?
करण्या त्याचा अंत
फणिवरा फिरतो गरुड नभात !

पहा भरारी गगनी मारी
दृष्टि फिरतसे येथ भूवरी
तव प्राणांचा अंत फणिवरा
फिरतो गरुड नभात !

सूडबुध्दिने येई अंधता
सुज्ञहि फसले बोल बोलता
आली झडप पुढचात !
फणिवरा, फिरतो गरुड नभात !

●

# कां ?

[घरदार, संपत्ती आणि आराम यांचा त्याग करून जगभर भटकणारे हे महात्मे वेडे आणि भिकारी म्हणून ओळखले जातात ! ]

काय कुणाला सांगावे
का फिरतो हे कोणा ठावे
गाद्यागिरद्या टाकुनिया घरी
का फिरतो मी दारोदारी
अन्नाची घरी, लयलूट–
उपवासी मग कां हे पोट
शिक्षित मी जरी पदवीधर
अश्रू कां हे गळती भूवर
दर्शन ज्याचे घेण्याला
गर्दी व्हावी गतकाळाला
त्या मी ऐसे का हिंडावे
कां फिरतो परी कोणा ठावे !

कोण्या काजा आलो येथे
काय करोनी मी परतावे
समजाया हे क्रमितो वाटऽ
सांगे का कुणी मज मार्गस्थ
मज वेड्याला कुणीही हसावे
कां फिरतो परी, कोणा ठावे ?

# भग्न मनोरथ

[ध्येयामागेच जो आयुष्यभर चालत होता त्याला शेवटी असा अनुभव यावा ना ?]

भग्न मनोरथ मृत आशांनी
अंतर जळते ज्वाळानी !

घसा कोरडा,
तहानलेला !

जीव व्याकुळे–
चालायाला !

जायचा असा का मी झिजुनी
अंतर जळते ज्वालांनी !

भास जलाचा,
होतचि होता–
थकुनी गेलो,
चाल चालता !

मृगजल ते मज आले कळुनी–
अंतर जळते ज्वाळानी !

सावंतवाडी
१५–१०–४३

●

# वेश्येच्या दारी !

तो– देहाची ह्या आग शमेना
म्हणुनि आलो तुझिया सदना
विन्मुख मजशी धाडुनि, तुजला
मिळवायाचे काय ?

देहविक्रया बसलिस येथे
जरा जर्जरां रमवू येते
अर्थावाचुनि मीहि न आलो,
का मग परतू सांग ?

ती– तुझ्यासारखा तरुण निधडा
मुको न शीला, शरिरा त्यातून!

रात्रंदिन जी जळते काया
शमविल तुजला काय ?

# दास आम्ही प्रभूचे

समुद्रात तारू लोटिले जे आपुल्या हाती
लावावे तीरी एकल्या भगवंता हाती !

दैवाचा वारा लागला वाहू जर उलटा
टाकतील गिळुनी तारु हे त्या संकटलाटा
अथांग जलधीत धिराचा हात कोण देणार
दयावंत प्रभूचा तेधवां सकलांना आधार
संकटिच्या मित्रा विसरुनी काय तुम्हा मिळणार
साहयाविन त्याच्या लोक हा रसातळा जाणार
दया म्हणुनी नाव एक त्या कृपावंत प्रभूचे
विश्वासुनि त्यावरी चालवा तारू हे तुमचे
बिशाद मग काय आम्हाला स्पर्श कोण करणार
दास आम्ही प्रभूचे जगी ह्या अजिंक्यची ठरणार!

(दर्यावर्दी दिवाळी अंक)

●

# नराची थोरवी

जगती हा नर बुध्दिवान
करिल कार्य जगी महान !

नमविल हा हिमाचला
आक्रमील आभाळा
सिंधूसम जलाशया
तरत हा महान ! ॥१॥

दिसण्या किती क्षुद्र असे
भूगोला हलवितसे
इतराना ठाव नसे
राहण्या ठिकाण ! ॥२॥

फुलविल हा चराचरा
दे सुगंध दिगंतरा
शांतीस्तव त्या अमरा
झटतसे सुजाण ! ॥३॥

कर्तृत्वा खेळवितो
आशेला झुलवीतो
पृथ्वीवरी उभवितो
अतुल स्वर्ग जाण !

●

# ध्येयाशिवाय ?

कोणतेही निश्चित ध्येय न ठरवताच धडपडत राहणारे लोक आढळतात त्यांना सांगावेसे वाटते—

तपश्चर्या कशाला, करितोसी सांग ?
　　खटपट, लटपट
　　करुनी झटपट
　　आक्रमिसी पंथ,
　　—परि कशाला सांग ?

घाण्याभोवती बैल फिरावा
　　कार्य न जाणे, मार्गची ठावा
　　ध्येयावाचुनि, मार्गचालुनी
　　दवडिसी आयू जाण !

ध्येय कोणते, मार्ग कोणता
　　मेळ परस्पर हवा तत्त्वता
　　हिरे म्हणूनी वेचिसी गारा
　　योग्य तुला का सांग ?

# जग कोणाचे

जग दुबळयांसाठी नाही
दुनिया बलवंताची बा ही
दुबळयांसाठी नाही मान
कोठुनि त्यांना बा अभिमान
खा लाथा अन् जळा मनातून
सुख नाही मरणाचेही
जग दुबळयासाठी नाहीं !

चेतव चेतव आग मनाची
आच असे ती अपमानाची
नको आवरू गती तियेची
पडु दे आहुती ! तरीही
जग दुबळयांसाठी नाही

मरणाचे भय सांग कुणाला
जगण्यासाठी काय भुकेला ?
स्वत्वासाठी मराच-मेला
जग बुडेल-बुडुदे त्याही
जग दुबळयांसाठी नाही

●

# निघालो प्रवासा

निघालो प्रवासा अनंताचिया जो–
न होते प्रवासाविना ठाऊक !

न पायी वहाणा तरी मी निघालो–
असा चाललो; चालणे हेचि प्राप्त!

निघालो प्रवासा अनंताचिया जो,
असंख्यात वाटा नि दाटी सभोती !

कुठे जाउ तेव्हा न समजे मनाला–
कळेना कुणी भ्रंशिली ही मती !

टाळून गर्दी नि गोंगाट जावे–
निर्धार केला; पुढे मी निघालो;
मागे न वळता किंवा थांबताही,
असा चाललो, ना कुणी संगत !

प्रवासा निघालो अनंताचिया जो,
न होते कुणीही मला सोबत
वांच्छा मनी ती न आली, न येती
परी भेट झाली तुझी ही निवांत !

कुठे जायचे ? मी तुला प्रश्न केला ?
'बसा ना !' मला बैसणे होइ प्राप्त!

निघालो पुढे जावया जेधवा मी
निघालीस तूही मला सोबत !

●

## चंद्रमौळी घर !

गृह माझे चंद्रमोळी
मी एकला निवासी;
ही सड्या जिवाची आग
नावरे; भिडे गगनासी !
दशदिशांमधुनि ये वारा,
करू पाहे श्रमपरिहारा
परि अग्नि विझतो का त्याने
फोंफावे उलट अशाने !
ह्या ज्वाला दिसति न कोणा,
साहती न अंतःकरणा !
करपल्या जीवाचे भोग
साहतो म्हणुनि मी त्यांना !!

●

## हळहळणारांस–

चिंतानलि जो जीव पोळला
जागा ना ज्या टेकायाला
जळती काया घेउनि कुठवर
जाइल जाउनि सांग ?
चित्त न जागी, चिंतित बसला
अनुभव नाही प्रसंग आला
कोण न ऐशा समयीं सांगा–
बावरता धिरकाय ?
जे जें बघती; हळहळ करिती,
डोळे पुसुनी मार्ग क्रमिती
अशा सज्जना सवाल माझा–
धजाल साह्या काय ?

●

# घ्या अमृतघट पिऊनियां !

मज नित्य वाटते सागरतीरा जावे
दुर क्षितिजाभिडते पाणी पिऊनी यावे
तेजाचा राजा भास्कर जेथे बुडे
प्यावया तेज ते जीव अहा धडपडे (१)

मऊमऊ वाळुवरी घ्या हो घ्या लोळण
अन् हृदयी धरा हे पवित्र वाळूकण
नाचतो पवन हा हरपुनिया भान
ह्या सागरलाटा ताल धरित त्यातून ! (२)

तेजाचा ज्यांना ध्यासच रात्रन्दिन
अन् वसे अंतरी ज्यांच्या नारायण
त्या भगवद्भक्ता दिव्यदर्शना द्याया
प्रभु तिष्ठे येथे ! 'सागरतीरा या, या !'(३)

आकाश उजळले लाख चांदण्या मिळुनी
हा चंद्रही मिरवे झोप स्वतः विसरूनी
सप्तर्षि पातले टाकुन अपुले ध्यान
ध्रुवराज पाहती अढळपदा विसरून ! (४)

बघ सहस्त्र नौका नांगरुनी नांगर
पाहती अशा ह्या दृश्या चेतोहर
'हा स्वर्गच येथे ! मुक्तद्वार हे सकला
जन या हो या, घ्या अमृतघट पिऊनिया !'

दर्यावर्दी १९४८

●

# मी दर्यांचा राजा

मी दर्याचा राजा
जिंकुनि बसविन, अंमल माझा !
लाटा मजशी नित कुजबुजती
दूर कुठेंशा बोलाविती
दूर देशची स्वप्ने पडती
स्वप्नासंगे मन हे जाई
        दूरच्या प्रवासा !

मज लाटांची भीती कसली
प्रारब्धाची अडगळ कुठली
कोणि न रोधिल पाऊल माझे
        सेवक मी देशाचा !

धृवताऱ्याला मार्ग विचारीत
अन् दर्यातील रत्ने वेचित
नक्षत्रांच्या गुंफित माला
        देश नेऊ वैभवा !

भारतीय ध्वज डौले मिरवित
स्वातंत्र्याची स्तोत्रे गात
पृथ्वी वळविन फेरित एका
        दर्या करूनि पार !

— गुंफराज

●

# नाखवा रे आता सांभाळ सुकाण !

दर्याच्या पाण्याला झालं तुफान
नाखवा रे आता सांभाळ सुकाण
आकाशाची भरुनि पोकळी
पाणी उसळते दिगंतराळी
सभोताल अंधार दाटला–
भयभीत होती प्राण ॥१॥

आकाशगंगा मिळे सागरा
फेर धरितसे चक्रीवारा
सामिल त्याला उधानवारा
सुटल्यागत रे बाण ॥२॥

दर्यामध्ये फिरे भोवरा
नाव फिरतसे त्यात गरारा
अस्थिर झाला वर धृवतारा
सुटले रे अवधान् ॥३॥

कृष्णनभाच्या छताखालती
दर्याच्या ह्या लाटांवरती
वादळवारा फेकीत जाळे
सोडू नको अवसान ! ॥ (४) ॥
दिपगृहांतील ज्योत विलोकुन
फिरव सुकाणू तोल सावरून
बहुमोलाचा जातो हा क्षण
हो विजयी श्रद्धावान् ॥ (५) ॥

(दर्यावर्दी, जानेवारी १९५४)

# रे माझ्या प्रियकरा

सोड शीड भरभरा
तांडेला, शिडात भरु दे वारा !
ही मतलय खारी वाहतसे झुळझुळ
अन् बाजूला हे पाणी करी चुळबुळ
रे, कुणी किनाऱ्यावरी घालिते शिळ
हे तुषार उडती, अंगावरती
भरती ये सागरा
नाविका सोड शीड भरभरा !

ही थंडी शिरशिरे नाजुक माझ्या अंगा
पदराशि सख्या मम वायु घालितो पिंगा
वर गगन शोभते विविध लेऊनी रंगा
हे सुकाण माझ्या हाति ठरेना
रे माझ्या प्रियकरा–
बाजुला बैस येऊनी जरा !

सखि थांब जरा मी तेथे येइ तोवर
हे तारु होऊ दे आरुढ वाऱ्यावर
मग मौज लुटूं या अथांग दर्यावर
जीवन आपुले स्वतंत्रतेचे
अजिक्य या सागरा
जिंकुनी स्वर्ग उभवू सुंदरा ! !

(दिवाळी विशेषांक १९५३, दर्यावर्दी)

# साम्राज्य आमुचे !

पसरल्या सभोती आसमंत जलराशी
अन् पडलेला खच येथे जलधि तळाशी
ती रत्ने नेईल लुटुनि लुटारू चोर ऽ
म्हणुनीच फौज का, लाटांची हुश्शार ?

खळखळती, सरकती, पुढे आजुबाजूला
कानोसा घेती; येईं कुठुनि का हल्ला;
जेधवा चंद्र ये उजळीत नीलाकाशी
तुम्ही पहा वैभवा, लोटतील पायांशी !

मग खेळ चालतो किती काळ पर्यंत
उन्माद झाकळे; सौम्य चांदणे आत
लागतो वहाया गार गारसा वारा
रतिभाव उफाळे, थरके प्रीत–किनारा !!

साम्राज्य आमुचे, आम्हीच दर्यावर्दी
जन्मलो वाढलो, इथेच बनलो दर्दी
ही घरे आमुची दिसति तुम्हा तारवे
जगतास घालतो फेरे ह्यांच्या सवे !

जन्मली, गाजली, येतिल आणखी किती,
साम्राज्ये अमर ना नाशच त्यांचा अंती
अपवाद्भूत जरी असेल बघणे कोणा
विभवाने विलसे एकच ह्या जलधीचे !!!

(प्रसिद्धी : दर्यावर्दी–दिवाळीभेट नोहें. १९४५)

●

# जीवन दर्याचे

जीवन दर्याचे, सुखाचे, वाटे मोलाचे
अथांग पाण्यावरी जगावे जीवन वाऱ्याचे !
क्षितिजाच्या पलिकडे देतसे कोणी हाकांना
अज्ञाताचा शोध घ्यावया हृदी स्फुरे चेतना !

अदृश्याची अस्फुट चित्रे दिसती वारंवार
दिवस रात्रीच्या अवकाशातुनि घेती ती आकार
लक्ष चांदण्यांची आम्हाला सोबत रात्रीची
दिव्य तेज त्यांचे चुंबिते दृष्टी अन् अमुची !

गृह-गोलाशी सख्य आमुचे नजर क्षितिजापार
हृदय घेत कधी ओढ घराशी आणि वाजते दार !

आणि दुडदुड धावत येई मूर्ती बाळांची
दारा आडुनि हले सावली ओढ मना तीची
क्षणांत जाते विरून सारे दृश्य मनापुढचे
मात्र समोरी दिसू लागते तांडव लाटांचे !

(प्रसिद्ध : दर्यावर्दी (मासिक) आणि सैनिक समाचार
'पाक्षिक' न्यू दिल्ली, जानेवारी १९७८)

# हे पटे मला आताच !

**सकाळी**

ही नाव वादळी फुटली
अन् फळी तेवढी उरली
फेंसाळ लाट जो येते
ही फळी सुटाया बघते
भेसूर जलांतिल मासे
जणू काळ पातला भासे
ना तीर दिसत दृष्टीला
पाणीच चहु बाजूला
पाण्यास नसे ह्या अंत
मज पुढें दिसे प्राणान्त !

**रात्री**

चमकती नभामधी तारे
अंतरी निराशा वितरे
वाहतो त्यांतुनि वारा
नेतसे मला का तीरा ?
अंतरी प्रभूला नमितों
ने तिरा असे विनवितो
गणगोत सखे ह्या वेळा
होतील रडाया गोळा
प्राणांति जयाचा तोच
हें पटे मला आताच !

२३-१२-४३

# जग हें--

जग हें दुःखाचा प्याला
चिरंजीव तो, पचविल ह्याला !
थोडी कटुता
थोडी मधुरता
रुची रुचीने भरला ।।
जग हे दुःखाचा प्याला

दुःखाचा पसरला हिमालय
प्रवास कुठला त्यांतुन निर्भय
परी सुखाचें
जीवन त्यांतुनि–
वाहतसे झुळझुळा ।।
जग हें दुःखाचा प्याला

योगी जनांची येथचि वसती
योगानंदी रमती डुलती
जगी निर्भया–
असाध्य काय ?
पूरचि येई गंगेला !
जग हें दुःखाचा प्याला ।।

# उठली पहाट

धुक्याची दुशाल बाजूला सारून
उठली पहाट गोड झोपेतून
गार गार वारा पहाटेच्या प्रहरा
सागराची साथ वाळूचा किनारा
देशाच्या रक्षणा नांगरती नौका
लाटांची खळबळ चालते ती ऐका
पोलादाची कांब विजेची त्या धार
टिळकांची वाणी स्वातंत्र्याचे सार
पहाटेच्या वेळी पक्षांचे उड्डाण
स्वातंत्र्यऽ मंत्राचे करीताती गान
बाजूला सागर वेदघोष करी
गीतेचे सार जे कर्मयोगापरी
पूर्वेच्या बाजूला सूर्याचे दर्शन
विज्ञानी पुरुषाला आत्म्याचे दर्शन !

# गोड भूल

[दुपार झाली होती. सोबती घरी परतले होते. त्याने पाहिलं– दूर अंतरावर कुणीतरी स्त्री उभी आहे. त्याच्या मनात उद्भवलेले विचार प्रस्तुत कवितेचा विषय आहे]

सूर्य माध्यान्ही नभी तळपताहे
खालीं अब्धीचा खेळ चाललाहे
किनाऱ्याची सिकताहि तापलेली
अशा वेळी ही कोण कशा आली ?
आजुबाजूला नसे साऊलीही
कशी उन्हाची तिरिप सहन होई ?
तहानेने जिव व्याकळुनी गेला
अशा स्थितिमाजी येथ ही कशाला ?
वस्त्र साधे अन् केस मोकळे हे
कृष्णवर्णांगी क्षितिज पाहताहे
कोण कोणाची, कुणा शोधिताहे ?
जवळ येतो, तो सखी तेथ आहे !

–प्रभु गुंफराज

•

# सखी आज पौर्णिमा

सखी आज पौर्णिमा
माझ्या सागराची
घाई झाली लोकांना
त्याच्या स्वागताची !

मनाचा उदार, त्याला–
राग परी फार !
संतापाची धार त्याची
कंपवित ऊर

सखी आज पौर्णिमा
माझ्या सागराची
जगा झाली घाई आज,
त्याच्या उत्सवाची

त्याला भेटायाचा माझा
मनी फार हेत,
थांबते ग पाऊल माझे,
काय जन–रीत ?

●

## चालली नाव

ही नाव जात दर्यात
ना भीती तिच्या हृदयांत
गर्जना जरी ही घोर
ना तिला तिची दरकार
वरि जातिवंत नावाडी
तो तिला पुढे हाकारी
जरि तुफानलेला वारा
अवरोधी मार्ग सामोरा
ठेऊनि दृष्टि सामोरी
चालवी नाव नावाडी ॥१॥

पाहते घरी ती वाट
येईल स्वारी इतक्यात
किती वाट तुझी पाह्याची
काळजी तुला ना त्याची
का उशिर आजला झाला
पाहुनि वाट जीव थकला
होताच स्मरण पत्नीचे
आतूर अंतरी झाला
चौफेर जरी हा वारा
चालवी नाव झरझरा ॥२॥

वादळी रुप जलधीचे
पाहुनी भयाकुल झाली
ही नार कशाला रडते
का देवाला विनवीते
देवा तू घरधनी राख

तू बाप तुझी मी लेक
तुजवीण रक्षिता कोण
तू तार, तुला मी शरण
प्रभु तारक ज्याला झाला
चालवी नाव झरझरा ! ॥३॥

## एक वात्रटिका

येतेस का तू सखये फिराया
वदे एक प्रेमी कुणा हो प्रियेला
अहा भांग डावा, लुगडे नवेसे
'आलेच पाहा' ये ऐकू ऐसे

फिरत गेली एकांत अशा स्थानी
आणि सन्मुख बैसली एक जागी
गोष्टी करितांना उशिर तहज झाला
क्रमे लागे काळोख पडायाला

वेळी ऐशा तो प्रेमवीर बोले
धन्य करशिल तू काय मला बाले
'इश्य हें हो बोलणे काय ऐसे ?'
आणि पुढचे राहिले पहायाचे !

# क्षणैक जीवन !

क्षणैक जीवन
कृती चिरंतन
विश्व उजाळे,
कृती कृतींतून ! १)

दिव्य कृतींचे,
दिव्य बीजांकुर-
दिव्य मानवी-
रुजति भुमीतून ! २)

ही तरुराजी
दिव्य फुलांनी
अनंत विश्वे
टाकिल मोहून ३)

थव्याथव्यांनी
दिव्य पक्षिगण
येऊनि नेतिल
सुफला तोडुन ! ४)

दिव्य फलांचा
स्वाद चाखतिल
दिव्य स्वरांची
गीते रचून ५)

मर्त्य भूमीला
अमर्त्य बनविल
स्त्रवेल रस जो-
त्या गीतांतून ! ६)

१०-५-४४

# विखुरलेले हे आशांकुर

उघडुनी डोळे बघ चौफेर
रम्य वनश्री नटली मनोहर
कुरणा मधुनी फिरती वासरे
भिर भिर उडती रानपाखरे
मंदाकिनी ही स्वैर वाहते
सुखद वाहतो मंद समोर !

वृक्षांना बघ लता बिलगल्या
कळ्या फुलांनी कशा वाकल्या
पतंग पंत्की वरून विखुरल्या
दृश्य पहाया हे चेतोहर

न्याहळुनी बघ संध्यादेवी
जरतारी तिज साडी शोभवी
विश्रांतीस्तव उत्सुकला रवि
सज्ज रमाही उघडुनी दार

वळणावर जव गाडी आली
वळताना जरी मंद भासली
पहिल्याहुनही गती वाढली

विखुरलेले हे आशांकुर
उघडुनी डोळे बघ चौफेर
रम्य वनश्री नटलि मनोहर

# मनांत येते

मनांत येते अजुनी सखये
तुला पहावे गे
अन् तुटलेले सांधुनि घ्यावे
प्रेमाचे धागे

वाटत होते विझेल कधितरी
हृदयीची आग
प्रेमजलाविण विझे न कधीही
समजुनि आले आज

क्षिती न तेव्हा केली साजणी
प्रेमळ हृदयाची
हृदय म्हणुनि हे फोडित टाहो
दु:ख मना जाची

भिक्षेसाठी दारी पाहुन
सखये उठशिल का
अभिमानाला बळी न पडता–
तुझाच ! म्हणशिल का ?

कां परि धरु मी, मनांत माझ्या
असली आशंका
प्रेमाच्या राज्यांत कुणी का
घे वेडी शंका?

# काजवे

काजवे जसे अंधारी
माणसे आम्ही संसारी !
स्वयंबुद्धीच्या मंद प्रकाशी
दीर्घ कल्पना– रम्य आकाशी
जीव खेळती रम्या कृतिशी
जोऽ, ना उजाडे तो

जीव केवढा, बुद्धी केवढी
विश्व केवढे झेप केवढी
जगी कुणास्तव सांग धडपडी
रेऽ, कोठपावेतो ?

प्रकाश केवळ तुझिया पुरता
परिस्थितीची जरी साह्यता
दुर्दैवे ती प्रतिकुल होता
अंधचि होशिल तो !

# भीति जगाला त्यांची

भीति नसे मज ह्या मरणाची
पर्वा न करू कळिकाळाची
उगवे दिन जो अस्ता जाय
विलीन वस्तू तत्वीं होय
वीज लकाके, कोठे जाय
        क्षिति कोणाला त्याची ?

मृत्यु येतसे परी एकदा
वेळ येतसे तीहि एकदा
दुष्ट दुर्मती छळत कितीदा
        साहवे न ती ठिणगी

नीति न त्यांना माणुसकी
प्रेम न हृदयी ना अनुभूती
अभिमाने ते सत्य तुडविती
        भीती जगाला त्यांची !

# तुझ्या महाली

कुबेर मीही घरचा जरी
तुझ्या महाली भणग भिकारी
दौलत तुझी अपरंपार
तुझ्या बरोबर जी मिळणार
मिळवाया ती कोण कुबेर
होइना भिकारी ?

जतन कराया श्रमलिस भारी
वांछित होतीस भागीदारी
मूकभाव तव मजशी कळता
केली मीहि तयारी !

तुला मानले; म्हणुनी आलो
दार खुले हे, आत पातलो;
पसंत तुजला जरी जाहलो,
का मग परक्यापरी ?

२५-१०-४३ बेळगाव

●

# आवर आवर

आवर आवर तुझी कटयार
नको करू रे फसवूनि वार
विश्वासाने आले येथे
दिले तूच ना अभिवचनाते
विसरुनियांतो सर्व प्रकार
नको करू रे फसवुनि वार !

तुला कधी का सांग दुखविले
तुझे कधीं का अनहित केले
अनुभऊ का मग उलट प्रकार
नको करू रे, फसवुनि वार

भयाण उठले वादळ-वारा
कसे करू मी त्या प्रतिकारा
ह्या वेळी रे तूच आधार
आवर आवर तुझी कटयार
नको करू रे फसवुनि वार !

# विठ्ठलाच्या मंदिरात

विठ्ठलाच्या मंदिरात
मंदिराच्या गाभाऱ्यांत
चिमणी पाखरे, कुजबुजतात
        कुणी पाहिलना कुणी येईलना
सर्वांसाठी खुले मंदीर
आणि त्यातच होय दुपार
पांथस्थांचा मार्ग समोर
चिमणी पाखरे कुजबुजतात
        कुणी पाहिलना, कुणी येईलना
वृक्षलतांची घनबनराई
दिसे त्यातुनी छान सराई
इकडे राई, तिकडे राई
चिमणी पाखरे कुजबुजतात
        कुणी पाहिलना कुणी येईलना ?
विठ्ठलाच्या मंदिरात
मंदिराच्या गाभाऱ्यात
कोणी कोणी तांदुळ टाकीत
तेच वेचुनी तेच टिपूनी
चिमणी पाखरे कुजबुजतात
        कुणी येईलना, कुणी पाहिलना ?
भगवंताची श्यामल मूर्ती
समान ज्या अपकीर्ती कीर्ती
नमुनीं वाकुनी तिचिया पुढती
चिमणी पाखरे कुजबुजतात
        कुणी येईलना कुणी पाहिलना ?

सा. वाडी २९–४–४४

# जागृति

आली आली जागृति रे !
उठ तरुणा–
घे हा झेंडा
फडकवि अस्मानी रे !

ऐक घुमतसे
गगनी नगारा
सुचवि आम्हाला जमण्यारे !

उठल्या ज्वाळा,
दाहीं दिशांनी–
चला प्रज्वळू त्यांना रे !

स्वातंत्र्याचे,
स्वप्न नाही हे
ते तर आले हाती रे !

उठा बंधुनो
घ्या हा झेंडा
जागवू या ही अवनी रे !

बेळगाव १९४२

•

# निसर्ग आणि मानव

आसरा भूमातेने दिला
त्या जीवनरस पाजिला
उपकार स्मरुनि तो, वृक्ष देतसे
शांत साउली तिला

वाहतो झरा खळखळा
कुणि मार्ग करूनि त्या दिला
वांछित पुरवी, सुपीक करूनि
प्रदेश तो दुर्जला

खाऊनिया पिकली फळे
तरुवरती कोकीळ डुले
गायनी तयाच्या वृक्षराज हो
उत्तेजित झाले

चाखुनी गानमाधुरी
घालिती तया पंजरी
मानवी सृष्टिची, कृतघ्नताही
हृदया व्याकूळ करी !

तांबोसे– २२-५-४४

# ही रीत

ही रीत प्रीतिची न्यारी
बंधनी सौख्य तिज भारी

अनुभवी सुखा त्या जाणे
शब्दांत कठीण ते येणे

हृदयांत भाव जे जमती
हृदयास फक्त ते कळती

घेऊनी फुले प्रीतीची
प्रीतीने प्रीतिला पुजणे

प्रीतीच जगा आधार
प्रीती न बघे घरदार

शोधिते पाणी पाण्याला
धुंडिते प्रीती प्रीतीला

प्रीतीच्या बसुनि नावेंत
चालवा नाव जलधींत

जगतास नाव ही प्यारी
बंधनी सौख्य तिज भारी !

# अंधारातील दिवा

हा दिवा तेवतो अंधारी
कुण्या युगाचा मानकरी

उधळि चहुकडे तेजकणांना
मार्ग दावितो कुणा सज्जना
उघड उघड रे उघडी नयना
उचल पाऊला सत्वरी
हा दिवा तेवतो अंधारी

चढण येथुनी असे पुढेही
अवघड मार्गी थकशिल तूही
नको करू परि चिंता काही
उचल पाऊला सत्वरी
हा दिवा तेवतो अंधारी

किती युगांचा तुझा प्रवास
मुक्कामावर आणि आलास
चढुनि जाया सोपानास
जा उचल पाऊला सत्वरी
हा दिवा तेवतो अंधारी !

●

# स्वर्ग सुखास्तव

नील नभाच्या घुमटावरती
चम् चम् चम् चम् रत्ने चमकती
नीलमणी त्यातुनी एखादा
घेई झोकुनी पृथ्वीवरती !

नीलनभाच्या घुमटावरती
नक्षत्रे अन् राशी जमती
त्यांना वाटे येऊनी येथे
राज्य करावे आम्हावरती

नीलनभाच्या घुमटावरती
तडिल्लता त्या चमकुनी जाती
कड् कड् शब्दे भेदुनि अंतर
लोळण घेती पृथ्वीवरती

स्वर्गसुखाची आवड कोणा
भूवर यावे हेच वांछिती
कळत असुनी हे ह्या लोकांना,
स्वर्गसुखास्तव झुरती ! मरती !!

# एक दृश्य !

जाता जाता वाटेमधुनी
केळ पाहिली बागेमधुनी
केळफळांचे फणे तेधवा होते वरती चार !

पानांच्या जणू पदराखाली
गोजिरवाणी बाळे अपुली
दृष्टी चंद्राची लागेल म्हणूनी लपवी त्यांस

चंद्राची वरी छाया शीतल
पदर वरी पानांचा शामल
स्वर्गामध्ये दुर्लभ सुख जे, भोगती तिचे बाळ

चार महिने बाळा झाले
लागती वरते मानवी डोळे
नरजातीला कठीण काय ? कापुनी नेली पार !

केळचांवीना केळ एकली
बाळांवीना जशी माऊली
रात्री अश्रूंचा पाऊस, त्यातची कंठी काळ !

जसे करावे तसे भरावे
तत्व जगाचे सर्वां ठावे
क्रूर वृत्तिचा मनुज अडाणी! खाई त्याला काळ!

●

# बाल बाला वंदिती देवराया

उदेलेला शुक्रही त्या नभांत
थंड वारा वाहतो कसा शांत
पूर्व बाजूला सह्य शोभताहे
मधुनि सरिता झुळझुळा वाहताहे

पारिजाताचा गंध कुठुनी येई
चित्तवृत्ती तन्मयाकार होई
झुंजुमुंजु ह्या दिशा होत आल्या
अंतरंगी कल्पना स्फूर्त झाल्या

आजुबाजूला सर्वही प्रशांत
कुणी बाला ये अशा समयी तेथ
पुनित व्हावे हा धरूनी मनी हेत
पुष्पवृष्टी वरी करीं पारिजात !

आवरोनी घ्यावया गालिचा तो
गुंतली ती लगबगा कुणी ये तो
आणि येताना हसत पुसे तीते
काम आम्ही करू नये साह्य तूते

शाल लज्जेची क्षणी पांघरोनी
उभी राहे ती, तोहि तिच्या ध्यानी
जणू भेटाया प्रभाती उषेला
बालरवी हा का येथ ठाकलेला !

येथ ओसंडे लाली ही गाली
दृश्य पाहुनी हे उषा लाल झाली
रूसुनी बैसे आतूर मनी झाली
तोच येऊनी पातला अंशुमाळी

मृत्युलोकी तू पाहसी कुणाला ?
म्हणूनी पाहे तो; दिसे काय त्याला–
पारिजाताची फुले अर्पुनिया
बाल– बाला वंदिती देवराया !

## शब्द थांबती अर्थ उलगडे

मन घेते धाव का तुझ्याकडे
मनात उजळे, इंद्रधनू का ?
सप्तरंग त्यातुनि दिसती का–

का आवेगें, मन घे उसळी ?
मने मनाला कशी बिलगली !

उब्दाना का अर्थ नुरे–
दृष्टिमधुनी तो कसा पाझरे

अर्थामागुनी शब्द धावती–
शब्द थांबती; अर्थ उलगडे !

# भाग्यवंत कोण

सुंदरपुरीच्या मध्यभागी हा
भाग्यवंत कोण ?
उभा राहुनी काय सांगतो
आम्हा लागून
कमरेला तलवार शोभते
कशी दिमाखाने
भ्याडांना पाहुनी हासते
विजयानंदाने
बाजूला हा तलाव आहे–
पाण्याने भरला–!
मूर्ती रेखितो गुणवंताची
पूजा करण्याला !
समोर दृष्टी ठेऊनी सांगे
सिधा मार्ग चाला
मार्ग चालता हातही द्यावा
दुबळ्या जीवाला
सुंदरपुरीच्या मध्यभागी हा
भाग्यवंत कोण
सुंदरपुरीचा उभा येथ हा
जनतेचा प्राण !

[सावंतवाडीचे लोकप्रिय महाराज कै. बापूसाहेब यांचा महात्मागांधींनी रामराजा असा उल्लेख केला होता. [महाराजांचा पुतळा मोतीतलावाच्या काठावर उभारलेला आहे.]

# નિખારે !

હે ધગધગતે લાલ નિખારે,
માર્ગી કુણીતરી તુફ્યા પસરલે,
નવા પ્રવાસી, અટળ નિશ્ચયી —
ઓડેલ ના કધી રાંગ!
નિંદેચે હાર કુણી ન સોશીલે,
દૂતર પ્રવાસી નં ના કચલે
નવ્યા ઝાંગીચ્યા ભાવી પુકારી
રવચેલ ના કધી રાંગ!
— પ્રભુ ગંધરાજ.